जावक क्र ७११/२६
जिल्हा न्यायालय, यवतमाळ
दिनांक ०५/०१/२०२६

# जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ

## —:दरपत्रक सुचना:—

जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ या आस्थापनेवरील नक्कल विभाग, अभिलेख विभाग, मुद्देमाल विभाग, ग्रंथालय विभाग येथे ''किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषधी फवारणी'' करण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे. करीता ज्यांना औषधी फवारणीबाबतचे दरपत्रक दाखल करावयाचे आहेत त्यांनी आपआपले दरपत्रक सिलबंद लिफाफ्यामध्ये आवश्यक त्या सर्व दराने विवरणासह जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथील कार्यालयात दिनांक ३१/०१/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. तसेच दरपत्रकाच्या लिफाफ्यावर ''किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषधी फवारणी'' असे ठळक अक्षरात लिहावे.

<u>किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषधी फवारणी दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे</u>

१. दरपत्रकावर ''किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषधी फवारणी'' असे ठळक अक्षरात लिहावे तसेच दरपत्रक पाठवणा—या संस्थेचे/पुरवठाराचे/व्यक्तीचे नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक स्पष्ट ओळखता येईल अशा प्रकारे लिहावे.

२. वेळेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

३. दरपत्रकामध्ये किटकनाशक व वाळवीनाशक औषधी फवारणीचे दर स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

४. जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथील आस्थापनेवर तसेच अंतर्गत तालुका न्यायालये येथे आवश्यकता असल्यास दरपत्रकातील नमुद तसेच मंजूर दरानुसारच आपणास वाळवी व किटकनाशक औषध फवारणी करुन दयावी लागेल.

५. दरपत्रक मंजूर किंवा नामंजूर करण्याचा सर्वस्वी अधिकार जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ अंतर्गत गठीत स्थानिक खरेदी समितीला राहील.

६. जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथील औध फवारणीबाबतचा कालावधी हा सन २०२६—२०२७ (दिनांक ३१/०३/२०२७ रोजीपर्यंत) या आर्थीक वर्षाकरीता राहील.

७. सादर केलेले दरपत्रक मंजूर झाल्यानंतर तसेच औषध फवारणी केल्यानंतर औषध फवारणी केल्याबाबतचे सहा महिण्याचे देयके या कार्यालयास सादर करावे लागेल व त्यासोबत फवारणी केल्याचे क्षेत्रफळ फुटासह फवारणी केल्याचे संबंधीत आस्थापनेकडुन स्वाक्षरीसह माहिती सादर करावी लागेल त्यानंतरच देयकाबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

८. दरपत्रक मंजुर झाल्यानंतर आस्थापनेवर वाळवी औषध फवारणी करण्याकरीता दुरध्वनीव्दारे कळविल्यानंतर सांगितलेल्या दिवशी व ठिकाणी औषध फवारणी करुन दयावी लागेल.

९. किटकनाशक फवारणीचे काम हे समाधानकारक नसल्यास सदर फर्मकडुन/संस्थेकडुन/व्यक्तीकडुन पुन्हा औषध फवारणी करावी किंवा कसे? याबाबत निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यवतमाळ यांना राहिल.

१०. दरपत्रकातील दर हा सर्व करांसह नमुद असलेले दराचा उल्लेख करावा.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
यवतमाळ.
दिनांक ०३/०१/२०२६

**प्रतिलीपी:—**

१. जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

२. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

३. तहसील कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

४. जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

५. नगर परिषद कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

६. सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

आदेशानुसार

03.1.2026

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ.